Academic Sports Scholars

ISSN: 2277-3665 Impact Factor : 2.9052(UIF) Volume - 5 | Issue - 12 | December - 2016

# 'महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील ग्रंथालय विषयक सोयी सुविधाचे विश्लेषणात्मक अध्ययन'

प्रकाश कांबळे
Ph.D. Scholar ,यवतमाळ.

### प्रस्तावना :

'शिक्षण' या शब्दामागे आधुनिक हा शब्द आल्याने त्या शब्दाची व्याप्ती ही गगनाला गवसणी घालणारी झालेली आहे. आधुनिकतेची वाटचाल प्रत्येक शतकात नवनव्या उंचीवर ज्ञानाला पोहोचवीत आहे. पुर्वीच्या युगातील वाचन लेखन व अंकज्ञान या शिक्षणाच्या संकल्पनेतून मर्यादांपलीकडे पोहोचलेली आहे. क्षणाक्षणाला वाढणारी ज्ञानाचे कोठारे गगनाच्या गाभाऱ्यातही मावेनाशी झाली आहेत. आजच्या शिक्षणाची ही दिशा जगाला अति भव्य दिव्य उंचीवर नेत आहे.

शारीरिक शिक्षणाच्या महाविद्यालयाची सध्यास्थिती लक्षात घेता तेथिल सोयीसुविधांची माहिती घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय स्तरावर एन.सी.टी.ई. सारख्या संस्थानी विकासात्मक सोयीसुविधा असाव्यात यांचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्या निर्देशांचा शारीरिक शिक्षण महाविद्यालयावर पडणारा प्रभाव पाहणे गरजेचे आहे. सदर अध्ययनाच्या माध्यमातून शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा ग्रंथालय सोयीसुविधा व शैक्षणिक दर्जा या संबंधीची माहिती प्राप्त होईल. तसेच एन.सी.टी.ई. च्या मापदंड व मानकाची पूर्तता किती महाविद्यालयांनी केली आहे. याची माहिती प्राप्त करुन घेता येईल.

### समस्येचे उद्देश

एन.सी.टी.ई. च्या मापदंड व मानकानुसार शारीरिक शिक्षण महाविद्यालया क्रीडा व शैक्षणिक गरजेनुसार आवश्यक ग्रंथालय सोयीयुविधा च्या उपलब्धतेचा शोध घेणे.



### परिकल्पना

महाराष्ट्रातील विविध शारीरिक शिक्षण महाविद्यालयात ग्रंथालयासंबंधी पुस्तकांची, जर्नलची संख्या व अन्य सोयी सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नसल्याचे दिसून येईल.

संशोधनासाठी नमूना निवड

महाराष्ट्रातील एन.सी.टी.ई. ची मान्यता प्राप्त केलेल्या विविध विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा अभ्यास करून सन २०११-२०१५ पर्यत या वर्षात एकूण १०६ महाविद्यालयापैकी, दैवनिर्देशन पद्धतीने ८० शारीरिक शिक्षण महाविद्यालयाची निवड करण्यात आली. महाराष्ट्रातील विविध शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या स्थापनेपासून एन. सी. टी. ई. चे मापदंड व मानके महाविद्यालयास बंधनकारक झाल्याच्या वर्षापासून ते २०१४-१५ या वर्षापर्यंत संशोधकाने संशोधनासंबंधी माहीती प्राप्त केली.

### न्यादर्श

महाराष्ट्रातील बी.पी.एड. शारीरिक शिक्षण महाविद्यालया तील माहिती एकत्रित करण्याकरिता महाराष्ट्रातील २१ विद्यापीठापैकी अकृषिक १० विद्यापीठाची निवड करण्यात आली. महाविद्यालयातील ८० प्राचार्य किंवा प्रभारी प्राचार्य, ८० ग्रंथपाल किंवा सहाय्यक ग्रंथपाल, या प्रमाणे नमुना निवड करुन प्रश्नावली द्वारे माहिती संकलीत करण्यात आली.

### संशोधन कार्य पध्दती

वर्तमान समस्येचे अभ्यासक्षेत्र महाराष्ट्रातील अमरावती, नागपूर, जळगाव, कोल्हापूर, सोलापूर, नांदेड, औरंगाबाद, पुणे, मुंबई विद्यापीठा पुरतेच मर्यादीत होते. तसेच सदर अध्ययनात एन.सी.टी.ई. व विद्यापीठाची मान्यता प्राप्त शारीरिक शिक्षण (बी.पी.एड. एक वर्षीय अभ्यासक्रम) महाविद्यालयांचा अध्ययनात समावेश केला गेला.

प्रस्तूत संशोधनात समस्येचा अभ्यास करतांना महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालये तसेच त्या महाविद्यालयातील प्राचार्य किंवा प्रभारी प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथपाल, विद्यार्थी, संस्थेचे अध्यक्ष, सचिव किंवा पदाधिकारी, या विविध स्त्रोताद्वारे माहिती संकलीत करुन, प्रश्नावलीद्वारे माहिती संकलीत केल्या गेली. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या मापदंड व मानकानुसार शारीरिक शिक्षण महाविद्यालयात असणाऱ्या ग्रंथालये, सोयी सुविधा तसेच महाविद्यालया समोर असलेले आव्हाने, समस्या, महाविद्यालयाची इमारती, ही माहिती संकलीत करण्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण प्रश्नावली पद्धतीचा अवलंब केला आहे.

### संशोधन साधनाची निर्मीती

संशोधनाकरिता तथ्य संकलनासाठी प्रश्नावली या साधनाची निवड केली आहे. प्रष्नावली मध्ये संषोधनासाठी घेतलेल्या विशयानुरूप व उद्देशानुसार तथ्य संकलनासाठी अत्यावश्यक प्रश्नांचा समावेश करण्यात आला. प्रश्नावलीची निर्मिती संशोधन पूरक विविध स्त्रोतातून प्राप्त व पथदर्शक अभ्यासांच्या माध्यमातून प्राप्त माहितीच्या आधारावार फेरबदलातून करण्यात आली. पुर्नः चाचणीने प्रश्नावलीची विश्वासहर्ता तपासण्यात आली यामध्ये संशोधन मार्गदर्शकांचे मार्गदर्शन वेळोवेळी घेण्यात आले.

### माहितीचे विश्लेषण

सर्व प्रथम प्राप्त केलेली माहितीचे एकत्रिकरण करण्यात आले, त्या माहितीची टक्केवारी काढून त्यांचे सारणी व आलेख तयार करण्यात आले. विविध

प्रकारा अंतर्गत विविध घटकांची माहिती 'काय स्कोअर' व्दारे काढण्यात आली व सार्थकता स्थर तपासण्यात आला. एन.सी.टी.ई. चे मापदंड व मानकानुसार महाविद्यालयातील विविध घटकांच्या प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण करुन निष्कर्ष तयार करण्यात आले.

### *महाविद्यालयातील ग्रंथालय संबंधी माहिती*

| | होय (%) | नाही (%) | एकूण (%) | Chi Square & P Value |
|---|---|---|---|---|
| ग्रंथालयात संदर्भग्रंथ | ७९<br>९८.८% | ०१<br>१.३% | ८०<br>१००.०% | Chi Square = 76.05<br>P Value = 0.001 |
| महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वाचन कक्षाची व्यवस्था | ३४<br>४२.५% | ४६<br>५७.५% | ८०<br>१००.०% | Chi Square = 1.80<br>P Value = 0.180 |
| महाविद्यालयात प्राध्यापकांकरिता स्वतंत्र वाचनकक्षाची व्यवस्था | २१<br>२६.३% | ५९<br>७३.८% | ८०<br>१००.०% | Chi Square = 18.05<br>P Value = 0.001 |
| महाविद्यालयाच्या ग्रंथालयात Educational encyclopedias, पुस्तके | ३३<br>४१.३% | ४७<br>५८.८% | ८०<br>१००.०% | Chi Square = 2.45<br>P Value = 0.118 |
| ग्रंथालयात झेरॉक्स सुविधा | १०<br>१२.५% | ७०<br>८७.५% | ८०<br>१००.०% | Chi Square = 45.00<br>P Value = 0.001 |
| ग्रंथालयात इंटरनेटची सुविधा | २३<br>२८.८% | ५७<br>७१.३% | ८०<br>१००.०% | Chi Square = 14.45<br>P Value = 0.001 |
| महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा वार्षीकांक प्रकाशन | ३३<br>४१.३% | ४७<br>५८.८% | ८०<br>१००.०% | Chi Square = 2.45<br>P Value = 0.118 |
| ग्रंथालयात दैनंदिन वाचकांची येण्याची व जाण्याची नोंद ठेवली | २८<br>३५.०% | ५२<br>६५.०% | ८०<br>१००.०% | Chi Square = 7.20<br>P Value = 0.007 |

महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात एन.सी.टी.ई. च्या मापदंड व मानका प्रमाणे महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अभ्यास केला असता. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथाची संख्या सर्वाधिक आहे व त्यांचे काय स्क्वेअर मूल्य ७६.०५ प्राप्त झाले. सार्थकता मुल्यात सकारात्मक फरक अधिक प्रमाणात निदर्शनास आला. फक्त संदर्भ ग्रंथ बाबत संकारात्मक प्रभाव दिसून आला.

परंतु ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्या करिता स्वतंत्र वाचन कक्षाचे काय स्क्वेअर मूल्य ०१.८०, ग्रंथालयामध्ये प्राध्यापकाकरिता स्वतंत्र वाचन कक्षाचे काय स्क्वेअर मूल्य १८.०५, ग्रंथालयामध्ये ज्ञानकोशाचे काय स्क्वेअर मूल्य ०२.४५, ग्रंथालयामध्ये झेरॉक्स सूविधा काय स्क्वेअर मूल्य ४५.००, ग्रंथालयामध्ये इंटरनेट सूविधा काय स्क्वेअर मूल्य १४.४५, ग्रंथालयामध्ये वार्षिकांक काय स्क्वेअर मूल्य ०२.४५, ग्रंथालयामध्ये दैनंदिन वाचकांची नोंद हे सर्व एन.सी.टी.ई. च्या मानकानुसार उपलब्ध नाही असे दिसून आले. सार्थकता मुल्यात नकारात्मक फरक अधिक प्रमाणात निदर्शनास आला. उपरोक्त साधन सुविधा ग्रंथालयामध्ये कमी प्रमाणात दिसून आल्या.
संभाव्यता यांचे कारण विद्यार्थ्याची ग्रंथालयासंबंधी असणारी आवड तसेच ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करीता आवश्यक निधी उपलब्ध नसल्यामुळे अधिकांश महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची व्यवस्था ही दैनावस्था असल्याचे दिसून आले यामध्ये सुद्धा आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे.

### *निष्कर्ष*

१. महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात एन.सी.टी.ई. च्या मापदंड व मानक प्रमाणे महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अभ्यास केला असता. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथाची संख्या सर्वाधिक आहे. या घटकात सकारात्मक प्रभाव दिसून आला. परंतु ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्याकरिता स्वतंत्र वाचन कक्ष, ग्रंथालयामध्ये प्राध्यापकाकरिता स्वतंत्र वाचन कक्ष, ग्रंथालयामध्ये ज्ञानकोश, ग्रंथालयामध्ये झेरॉक्स सूविधा, ग्रंथालयामध्ये इंटरनेट सूविधा,ग्रंथालयामध्ये वार्षिकांक, ग्रंथालयामध्ये दैनंदिन वाचकांची नोंद हे सर्व एन.सी.टी.ई च्या मानकानुसार उपलब्ध नाही असे दिसून आले. या घटकात नकारात्मक प्रभाव दिसून आला.
२. महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयात एन.सी.टी.ई. च्या मापदंड व मानक प्रमाणे महाविद्यालयातील पडलेल्या विविध घटकांच्या प्रभावाचे विश्लेषण केले असता महाविद्यालयीन विभाग, प्रशासकिय विभाग, सोयी सुविधा, प्रयोगशाळा, खेळ व क्रीडा साहीत्य, कार्यालयीन सुविधा, ग्रंथालय, संस्थापक, प्राध्यापक, व विद्यार्थी या घटकावर पडलेला प्रभाव पडताळला असता बहुतांश महाविद्यालये मापदंड व मानकांची पुर्तता करु शकत नसल्यामुळे आर्थिक दृष्टया, सामाजिक दृष्टया व विकासात्मक दृष्टीकोनातून सक्षम नाहीत.

*संदर्भ :–*

१.जर्दे श्रीपाल 'शारीरिक शिक्षणाचा इतिहास' अंबा प्रकाशन, कोल्हापूर. १९९९

२.भटकर आर. एम. 'शारीरिक शिक्षणाचा जागतिक इतिहास' स्वप्नील मुद्रण, परतवाडा. १९८७

३.वाखारकर वि. गो., डॉ. आलेगांवकर प. म., 'शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासिक स्वरुप' पार्वती प्रकाशन संस्था, पुणे. १९८४

४.नॅशनल पॉलीसी ऑन एज्युकेशन १९८६ प्रोग्राम ऑफ ॲक्शन, गव्हरमेंट ऑफ इंडीया. नोव्हेबर १९८६,

५.कुलकर्णी विश्वभंर, डॉ. भिंताडे विनायक रामचंद्र, भारतीय आधुनिक शिक्षण : समस्या आणि उपाय, विद्या प्रकाशन, पुणे., २६ जाने २००७.

६.चहाल नविन, दर हफिजउल्हा (२०१५) 'हायर एज्युकेशन सेक्टर इन इंडीया. चॅलेंजेस ऑफ सस्टॅनूबीलीटी.' इंटर नॅशनल जर्नल ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲड रिव्हयू. खंड ५,

७.मान ज्योती, शर्मा कल्पना (२०१५) 'फिजीकल एज्युकेशन टिचर्स प्रिपरेशन प्रोग्राम इन नॉर्थ इंडीया. एन ॲनालेसीस.' इंटर नॅशनल जर्नल ऑफ फिजीकल एज्युकेशन रिसर्च खंड २,आवृत्ती

८.डॉ सिंग सुनिता, डॉ सिंग विनोद कुमार (२०१५) 'अचिव्हींग क्वालीटी इंन हायर एज्युकेशनः व्हॉय ॲड हाऊ.' एज्युकेशनल इंडियन जर्नल अ क्वॉटरली रेर्फड जर्नल ऑफ डॉयलॉग्ज ऑन एज्युकेशन, आवृत्ती ४ खंड १,

९.संगीता, डॉ. धैल पुनम (२०१५) 'क्वालीटी ॲशूरंन्स इन टिचर्स एज्युकेशन, इनटेंटिव्ह ॲड चॅलेंज अहेड.' एज्युकेशन इंडीया जर्नल .' खंड ४, आवृत्ती १

१०.मनोज कुमार (२०१५)'कंट्रक्शन ऑफ नॉर्म फॉर हेल्थ रिलेटेड फिजीकल फिटनेस फॉर १६ टू १८ इअर कॉलेज मेन स्टूडंट.' युरोपीयन ॲकॅडेमिक रिसर्च.' खंड ३, आवृत्ती ५

११.www.ncte.ac.in

१२.www.ugc.ac.in 20.

१३.Government Educational policy of india



*प्रकाश कांबळे*
**Ph.D. Scholar ,** *यवतमाळ.*